लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !



# Coronavirus: पाच वर्षांच्या मुलाचा मृतदेह घेऊन तो ८८ किमी चालला

ही बातमी समोर येण्यासाठी एक आठवडा लागला

लोकसत्ता ऑनलाइन | March 31, 2020 08:24 am



देशामध्ये २४ एप्रिलपासून करोनाचा प्रादुर्भाव थांबवण्यासाठी लॉकडाउनची घोषणा करण्यात आली आहे. मात्र त्याच दिवशी आंध्र प्रदेशमधील एका बापाला सर्व सार्वजनिक वाहतूक सेवा बंद असल्याने आपल्या पाच वर्षांच्या मुलाचा मृतदेह घेऊन ८८ किलोमीटरची पायपीट करावी लागल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. एका लहानश्या खेड्यात राहणाऱ्या या व्यक्तीला आपल्या मुलावर अंत्यसंस्कार करण्यासाठी इतकं अंतर पायी चालावं लागलं.

लॉकडाउनमुळे देशातील अनेक भागांमध्ये संचारबंदीचे कडोकोरपणे पालन केलं जात आहे. त्यामुळेच अनंतपुरम जिल्ह्यातील गोरांतला गावातील ही बातमी समोर येण्यासाठी एक आठवडा लागला. मनोहर (३८) असं या व्यक्तीचं नाव असून तो रोजंदारीवर काम करतो. मनोहरचा पाच वर्षांचा मुलगा देवा हा अचानक आजारी पडला. घशाचा संसर्गाचा त्रास देवाला होत होता. त्यावच उपचार करण्यासाठी आधी देवाला स्थानिक रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं. मात्र देवाची प्रकृतीमध्ये काहीच सुधारणा होत नव्हती. उलट

तेथील डॉक्टरांनी देवाला वाचवायचं असेल तर त्याला मोठ्या आणि अत्याधुनिक सेवा असणाऱ्या रुग्णालयामध्ये नेण्याची गरज असल्याचं मनोहरला सांगितलं. मात्र मोठ्या रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी कोणतेच साधन उपलब्ध नव्हतं. अखेर बुधवारी देवाच्या नाकातून आणि तोंडातून रक्तस्त्राव झाला आणि त्यानंतर काही काळातच त्याचा मृत्यू

लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !

संचारबंदीमुळे कोणतेच वाहन उपलब्ध नसल्याने मनोहरने देवाचा मृतदेह हातात घेऊन चक्क ८८ किलोमीटरचे अंतर पायी कापले. चित्रावती नदीच्या किनारी मनोहरने आपल्या मुलावर अंत्यसंस्कार केले.

***लोकसत्ता आता टेलीग्रामवर आहे. आमचं चॅनेल (@Loksatta) जॉइन करण्यासाठी येथे क्लिक करा आणि ताज्या व महत्त्वाच्या बातम्या मिळवा.***


JUST NOW! VIDEO: गिरीश कुबेरांनी वाङ्मयचौर्य केले का?
X

**Web Title:** Coronavirus Amid Lockdown Andhra Man Walks For 88 Km With 5 Year Old Sons Body To Reach Nearest Crematorium Scsg 91

टॅग Coronavirus

## आणखी संबंधित बातम्या


चाचणी होण्याआधीच माकडांनी पळवले करोना रुग्णांचे नमुने, स्थानिकांमध्ये संसर्ग पसरण्याची भीती


मनुष्यबळ आणि जोखीम

लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !

मनोरंजन 1 of 5



JUST NOW! VIDEO: गिरीश कुबेरांनी वाङ्मयचौर्य केले का?

X



गलफ्रेण्डला भेटायला बिहारला जायचंय; बॉयफ्रेण्डच्या विनंतीवर सोनू सूद म्हणतो...







वेचक वेधक 1 of 9



लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !



JUST NOW! VIDEO: गिरीश कुबेरांनी वाङ्मयचौर्य केले का?

X

- SSC HSC Exam
- Tik Tok
- Jacinda Ardern
- Pimpri Chinchwad
- Facebook Shopes
- Salman Khan

More Loksatta

iPhone ePaper Facebook Twitter Android App RSS You Tube

The Indian Express Group

The Indian Express
The Financial Express
Loksatta
Jansatta
Ramnath Goenka Awards
inUth

About Us | Contact Us | Privacy Policy | Feedback | Site Map

Copyright © 2020 The Indian Express [P] ltd. All Rights Reserved.